**लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गांवातर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत नवीन कामांचा समावेश करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासननिर्णय क्रमांक-विकास २०१८/प्र.क्र.२२५ /योजना-६**
**बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई-४०००१.**
**दिंनाक - ०१ फेब्रुवारी, २०१९.**

**वाचा-:**

१) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक -विकास-२०१५/प्र,क्र.५२/योजना-६,दि.२७.०३. २०१५.

२) ग्राम विकास विभाग, शासननिर्णय क्रमांक -विकास-२००५/प्र.क्र.२७४/योजना-६,दि. १६ १२.२०१५.

३) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक -विकास-२०१८/प्र,क्र.२२५/योजना-६,दि. २२.१०. २०१८.

**शासन निर्णय-**

लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतंर्गत शासन निर्णय क्रमांक-विकास-२०१५/प्र.क्र.५२/योजना-६, दिनांक २७ मार्च २०१५ अन्वये खाली नमुद "अ" प्रमाणे कामे विहित करण्यात आलेली आहेत. शासन निर्णय क्रमांक - विकास - २०१५/ प्र. क्र. २७४ / योजना -६, दिनांक १६ डिसेंबर, २०१५ अन्वये खाली नमूद "ब" प्रमाणे कामे विहित करण्यात आलेली आहेत. तसेच शासन निर्णय क्रमांक - विकास - २०१८ / प्र. क्र. २२५ / योजना -६, दिनांक २२ ऑक्टोबर, २०१८ अन्वये खाली नमूद "क" प्रमाणे कामे विहित करण्यात आलेली आहेत.

लोकप्रतिनिधीकडून गावांतर्गत विविध सुविधांसाठी प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेऊन संदर्भाधिन शासन निर्णयांन्वये विहित केलेल्या कामांमध्ये खाली नमूद "ड" प्रमाणे नवीन कामांचा समावेश करण्यात येत आहे :-.

२. लोकप्रतिनिधीकडून गावांतर्गत विविध सुविधांसाठी प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेऊन संदर्भाधिन शासन निर्णयांन्वये विहित केलेल्या कामांमध्ये खाली नमूद "ड" प्रमाणे नवीन कामांचा समावेश करण्यात येत आहे:-

**अ)योजनेंतर्गत घ्यावयाची कामे:-**

१) गावांतर्गत रस्ते,गटारे सुधारणा करणे.

२) पाऊसपाणी निचरा (Storm Water Drainage)

३) दहनभुमी व दफनभुमीची सुधारणा करणे.

४) संरक्षक भिंत बांधकाम करणे.

५) ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम करणे.

६) आठवडी बाजारासाठी सुविधा पुरविणे.

७) गावामध्ये कचरा डेपोसाठी व प्राथमिक प्रक्रियेसाठी सुविधा पुरविणे.

८) सार्वजनिक जागेत वृक्ष लागवड व त्यांचे संरक्षण करणे.

९) सामाजिक सभागृह/समाजमंदिर बांधकाम करणे.

१०) सार्वजनिक शौचालये बांधकाम करणे.

११) रस्त्यांवर पेव्हींग ब्लॉक बसविणे.

१२) व्यायामशाळा/आखाडा बांधकाम करणे.

१३) प्रवासी निवारा शेड बांधकाम करणे.

१४) वाचनालय बांधकाम करणे.

१५) नदीघाट बांधकाम करणे.

१६) बगीचे व सुशोभीकरण करणे.

१७) पथदिवे बसविणे.

१८) चौकाचे सुशोभिकरण करणे.

१९) गावातर्गत अन्य मुलभूत बाबी.

**(ब) <u>यापूर्वी नव्याने समाविष्ट झालेली कामे</u> :-**

१) अंगणवाडी नुतनीकरण (रु.५०,०००/- च्या मर्यादेत) बळकटीकरण/सुशोभिकरण व डिजीटल अंगणवाडी करणे.

२) सौरऊर्जा पंपासह पाणीपुरवठा योजना ( १ ते १० एच.पी. पर्यंत ) घेणे.

३) घनकचरा विल्हेवाट लावण्यासाठी सयंत्राचा वापर करून घनकचरा व्यवस्थापन करणे.

४) प्रिफेब्रिकेटेड (Prefabricated) अंगणवाडी / ग्रामपंचायत कार्यालय /सार्वजनिक वाचनालय / सामाजिक सभागृहाचे बांधकाम करणे.

५) शुद्ध पिण्याचे पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी शुद्धीकरण संयंत्र (RO) प्रणाली बसविणे व देखभाल दुरूस्ती

**<u>(क) यापूर्वी नव्याने समाविष्ट झालेली कामे :-</u>**

१) जिल्हा परिषदांच्या शाळांचे नुतनीकरण.

२) जिल्हा परिषदांच्या शाळांची तसेच अंगणवाड्यांची ( विशेषत: पडीक व मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्या इ. ) दुरूस्ती.

३) अंगणवाडी व जिल्हा परिषदांच्या शाळांच्या ठिकाणी शुद्ध पिण्याचे पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी शुद्धीकरण संयंत्र (RO) बसविणे.

तसेच रंगरंगोटी व सजावट ही लोकसहभाग/ग्रामपंचायत किंवा जिल्हा परिषद फंडातून करावी.

**(ड) नव्याने समाविष्ट करावयाची कामे :-**

१) अभ्यासिका बांधकाम करणे.

२) अभ्यासिकेसाठी ऑफ ग्रीड सौर सिस्टीम बसविणे.

३) वयोवृद्धासाठी (ज्येष्ठ नागरिकासाठी) पार्क तयार करणे.

४) सार्वजनिक ठिकाणी सी.सी. टी. व्ही. बसविणे.

५) महिला ग्रामसंघ इमारत बांधकाम करणे.

उपरोक्त कामे इतर योजनांमधून कार्यान्वित केलेली नाही, याची दक्षता/खात्री करूनच पुढील कार्यवाही करावी. जेणेकरून योजनेची व खर्चाची द्विरूक्ती होणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५१८११३४०५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANOJ DATTATARY JADHAV

Digitally signed by MANOJ DATTATARY JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, postalCode=400001, street=BHANDHKAM BHAVAN,25 MARZBAN PATH,FORT,MUMBAI, serialNumber=2766afda86350272237dcf9a191545970f7f12e66d0605c664ca2bf0f3001dc0, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MANOJ DATTATARY JADHAV
Date: 2019.03.28 17:26:52 +05'30'

**(मनोज जाधव)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विधानसभा/मा. विधानपरिषद सदस्य (सर्व), विधानमंडळ, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अतिरिक्त मुख्य सचिव, नियोजन/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
११. महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१२. विभागीय आयुक्त, सर्व.
१३. जिल्हाधिकारी, सर्व.
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).
१५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).
१६. सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग.
१७. निवडनस्ती- कार्यासन, योजना-६.